महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर   https://jeevandeepvarta.com   मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे   Rs.2/-

शुक्रवार ❖ १७ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - २०३ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024


## धोकादायक इमारती पुनर्विकासाचा मार्ग सुकर

### पालिका आयुक्त सौरभ राव आणि खासदार नरेश म्हस्के यांच्यात चर्चा



दैनिक ठाणे जीवनदीप

ठाणे : ठाणे शहरातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने व्हावा व नागरिकांना मालकी हक्काची घरे उपलब्ध व्हावीत यासाठी ठाण्यातील काही विकासकांनी खासदार नरेश म्हस्के यांना निवेदन सादर केले होते. या पार्श्वभूमीवर बुधवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेवून खासदार नरेश म्हस्के यांनी ठाण्यातील जीर्ण इमारतींच्या पुनर्विकास मंजुरीसंदर्भात येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा केली. यामध्ये अतिरिक्त मनुष्यबळासह आवश्यक असलेल्या सर्व बाबींची मंजुरी देण्याबाबत आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे खासदार म्हस्के यांनी नमूद केले. यामुळे आता ठाण्यातील धोकादायक इमारतीचा पुनर्विकासाचा मार्ग सुकर होणार आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, उपनगरअभियंता सुनील पाटील, कार्यकारी अभियंता महेश रावळ, रविशंकर शिंदे, संगीता सामंत, ठाणे शहर पुनर्विकास समिती (टीसीआरए)चे विद्याधर वैंशपायन, महेश बोरकर, जतीन शहा, सुमेध पाटणकर, सचिन भोसले, आशुतोष म्हस्के, आदित्य वैंशपायन, ऋषिकेश दंडे, सचिन म्हात्रे, उमंग सावला आदी उपस्थित होते.

ठाण्यातील जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न हा नागरिकांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. पुनर्विकाससंदर्भात शहर विकास विभागाकडे अनेक प्रस्ताव सादर होत असतात. परंतु मनुष्यबळाअभावी यासाठी विलंब होत असतो, यामध्ये आवश्यक शुल्क भरून बांधकाम परवाना मिळण्यासाठी विलंब होत असल्याने या विभागाकडे अतिरिक्त मनुष्यबळ द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली असून यास आयुक्तांनी संमती दर्शविली आहे.

तसेच विकास प्रस्तावास मंजुरी देत असताना मेट्रो उपकर लागू करण्यात येतो, यासाठीचा देय असलेला एफएसआय यूडीसीपीआर २०२०मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी या मागणीवर त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. जुन्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना मान्यता देत असताना आधारभूत एफएसआयची गणना करण्यासाठी टॅक्स असेसमेंटचे वर्ष आणि क्षेत्र प्रमाणित करण्यासाठी पुरावा म्हणून मुल्यांकन नोंदी विचारात घेतल्या जातात, परंतु त्या ठिकाणी अनधिकृत इमारत नसताना देखील केवळ क्षेत्रफळाचा आकार जास्त असल्यामुळे यावर अधिकचा आकार लावण्यात येतो, याबाबत दप्तरी नोंदीनुसार आकारणी करण्यात यावी असेही आयुक्तांनी नमूद केले.

विकास प्रस्तावातंर्गत येणारे रस्ते व प्रॉपर्टी कार्ड हस्तांतरणाबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. याबाबतचे शुल्क विकासकाकडून घेतल्यानंतर याबाबतची कार्यवाही महापालिका स्वतः करेल असा निर्णय आयुक्तांनी घेतला असून यामुळे विकासकांना दिलासा मिळणार आहे.

मोकळया जागेसंदर्भात आयुक्तस्तरावर निर्णय

विकास प्रस्तावामध्ये यूडीसीपीआरअंतर्गत टेलीकॉम रूम, ड्रायव्हर रूम यासाठी जागा उपलब्ध करणे आवश्यक आहे, परंतु कमी जागेमुळे हे शक्य होत नाही. तरी २ हजार चौमीपर्यतच्या भूखंडांना यामध्ये सूट देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबत नगरविकास विभागाच्या मुख्य सचिवांकडे आवश्यक पत्रव्यवहार करून निर्णय घेण्यात येईल, असे आयुक्तांनी नमूद केले. तसेच प्रस्तावित भूखंडाच्या मागे व लगत असलेल्या मोकळया जागेसंदर्भात आयुक्तस्तरावर निर्णय घेण्यात येईल, असेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले.



## शासकीय सेवा लाभार्थ्यांना जलदगतीने पोहोचवा

### मुख्यमंत्र्यांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना सूचना

दैनिक ठाणे जीवनदीप

मुंबई, दि. १६ : राज्यातील नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यासाठीची ऑनलाईन प्रणाली विकसीत करा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्री परिषदेची बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह कॅबिनेट आणि राज्य मंत्री उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हणाले की, राज्यातील विविध विभागांच्या ९६९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी आपले सरकार पोर्टल वर ५३६ सेवा उपलब्ध आहेत. ९० सेवा संबंधित विभागांच्या पोर्टल वर उपलब्ध आहेत. मात्र सुमारे ३४३ सेवा ऑफलाईन पध्दतीने दिल्या जातात. मात्र या सर्वच सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. ज्या सेवा सध्या ऑफलाईन पध्दतीने दिल्या जातात त्या सर्व ऑनलाईन करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने पुढाकार घ्यावा. येत्या शंभर दिवसात हे काम पूर्ण करा. अनेक सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या नाहीत, त्या सर्व सेवा अधिसूचित करण्यासाठी संबंधित मंत्री आणि सचिवांनी पुढाकार घ्यावा. नागरिकांना सुमारे ९९ टक्के शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार जाण्याची आवश्यकता भासणार नाही, असेही त्यांनी सांगितले. राज्यात आपण ईज ऑफ डूईंग बिझनेस संकल्पनेवर काम करण्यावर भर देत आहोत. त्यानुसार अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यावर भर दिला पाहिजे. क्षेत्रीय स्तरावरील अधिकार शासनाकडे केंद्रीत केले जाऊ नये, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

> ज्या सेवा सध्या ऑफलाईन पध्दतीने दिल्या जातात त्या सर्व ऑनलाईन करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने पुढाकार घ्यावा. येत्या शंभर दिवसात हे काम पूर्ण करा. अनेक सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या नाहीत, त्या सर्व सेवा अधिसूचित करण्यासाठी संबंधित मंत्री आणि सचिवांनी पुढाकार घ्यावा. नागरिकांना सुमारे ९९ टक्के शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत.- मुख्यमंत्री

बुलडाणा जिल्ह्यातील केस गळतीच्या घटनांबाबत मंत्री परिषदेत चर्चा झाली. केस गळती झालेल्या लोकांच्या अन्न आणि पाण्याचे नमुने घेतले आहेत. सकृतदर्शनी हे प्रकार बुरशीच्या प्रादुर्भावामुळे होत असल्याचे निदर्शनास येत आहे. बाधित नागरिकांना औषधे आणि मलम वितरित करण्यात आले आहेत. त्यामुळे केस गळतीच्या प्रमाणात घट झाली असल्याचे स्पष्ट होत आहे, अशी माहिती आरोग्य विभागाच्यावतीने देण्यात आली. यावर अशा प्रकारांबाबत आरोग्य विभागाने सतर्क रहावे. तातडीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच अशाच प्रकारच्या घटना वर्धा येथे आढळून येत आहेत. त्याकडेही लक्ष द्यावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.



## नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध होणार

### - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

दैनिक ठाणे जीवनदीप :

**ठाणे,दि.१६ :** राज्यातील विविध विभागांच्या ९६९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी आपले सरकार पोर्टल वर ५३६ सेवा उपलब्ध आहेत. ९० सेवा संबंधित विभागांच्या पोर्टल वर उपलब्ध आहेत. मात्र सुमारे ३४३ सेवा ऑफलाईन पध्दतीने दिल्या जातात. त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५ च्या कलम ३ (१) अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त महसूल कार्यालयांमार्फत नागरिकांना विविध सेवा पुरविण्यात येतात. नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत काल मर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिल प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये (परिशिष्ट सोबत जोडले आहे) नमूद केल्याप्रमाणे या सेवांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

## ठाणे जिल्ह्यात ९९ कोटीची आरटीई रक्कम थकीत

दैनिक ठाणे जीवनदीप

**ठाणे -** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायद्याअंतर्गत वंचित, दुर्बल व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुलांना खासगी, विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश दिले जातात. यामध्ये पालकांचा अधिकतर ओढा हा इंग्रजी शाळांकडे असतो. मात्र २०१६ नंतर राज्य शासनाकडून एकदाही शाळा व्यवस्थापनांना पूर्ण शालेय शुल्क परतावा देण्यात आलेला नाही.

जिल्ह्यातील ५८८ हुन अधिक लहान - मोठ्या इंग्रजी शाळांचे तब्बल ९९ कोटी रुपयांचे शुल्क परतावा थकीत आहे. यामुळे येत्या शैक्षणिक वर्षांपासून जिल्ह्यातील इंग्रजी शाळा आरटीईचे प्रवेश घेणार नाहीत असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र इंग्रजी शाळा ट्रस्टी संघटनेकडून (मेस्टा) देण्यात आल्याने हजारो गरजू विद्यार्थ्यांपुढे मोठी समस्यां उभी राहणार असल्याची दाट शक्यता आहे.



आर्थिक दृष्टया मागास आणि गरजू विद्यार्थ्यांना देखील उत्तम शाळांमध्ये शिक्षण मिळावे यासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार(आरटीई) कायद्या आणण्यात आला. याअंतर्गत वंचित, दुर्बल व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुलांना खासगी, विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश दिले जातात. यामुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळत आहे. तसेच आरटीईच्या माध्यमातून प्रवेश मिळावा यासाठी देखील मोठ्या प्रमाणात नोंदणी करण्यात येते. तर ज्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात येतो त्याचे शैक्षणिक शुल्क राज्य शासनाकडून संबंधित शाळा व्यवस्थापनाला देण्यात येते. इंग्रजी शाळांमध्ये आपल्या पाल्याला प्रवेश

### शाळांचा कारभार कसा चालवायचा ?

मिळावा यासाठी पालकांचा मोठा ओढा असतो. तर इंग्रजी शाळांमध्ये शालेय शुल्क अधिक असल्याने गरजू पालक या आरटीईच्या माध्यमातून आपल्या पाल्याला प्रवेश मिळवण्यासाठी धडपड करत असतात. मात्र आता राज्य शासनाकडून २०१६ नंतर राज्यातील शाळांना आरटीईचा पूर्ण शुल्क परतावाच मिळालेला नाही. यामध्ये ठाणे जिल्ह्यातील ५८८ हुन अधिक इंग्रजी शाळांचा समावेश आहे.

या शाळांचा तब्बल ९९ कोटी रुपयांचा आरटीईचा शुल्क परतावा थकीत असल्याने शाळांसमोर आर्थिक गणित बसविण्याचे आवाहन आहे.



## बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर घरातच चाकूहल्ला

दैनिक ठाणे जीवनदीप

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर मुंबईतील राहत्या घरात अज्ञात क्रिकेट व्यक्तीकडून चाकूहल्ला करण्यात आला आहे. घरात शिरलेल्या चोरट्याने सैफ अली खानवर तब्बल ६ वार केले असून, दोन जखमा खोलवर आहेत. फुटबॉल त्यातल्या एका जखमेचे ठिकाण सैफच्या मनक्यावर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. सध्या त्यांच्यावर लिलावती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेत सैफसोबत मोलकरणीवर देखील हल्ला झाला असून तिच्या हाताला गंभीर इजा झाली आहे.

मुंबई पोलिसांनी या प्रकरणी सैफच्या मोलकरणीचा जबाब नोंदवला आहे, ज्यातून एक धक्कादायक माहिती उघड झाली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, काल रात्री एक अज्ञात व्यक्ती सैफ अली खानच्या घरात घुसला आणि मोलकरणीसोबत जोरदार वाद घालू लागला. सैफने हस्तक्षेप करून परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यावेळी त्या व्यक्तीने सैफवरच हल्ला केला. मुंबई पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले आहे आणि सैफ अली खानवर सहा वेळा चाकूने वार करणाऱ्या मुख्य गुन्हेगाराला पकडण्यासाठी तपास सुरू आहे. सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान आणि त्याच्या घरातील नोकराने पहाटे ३.३० वाजता त्याला रुग्णालयात आणले.

लीलावती रुग्णालयाचे सीईओ डॉ. नीरज उत्मानी यांनी सांगितले की, 'सैफ अली खान यांना पहाटे ३:३० वाजता रुग्णालयात आणण्यात आले. त्याच्या शरीरावर चाकूचे सहा जखमा आहेत, त्यापैकी दोन खोल आहेत. एक दुखापत त्याच्या मणक्याजवळ आहे. शस्त्रक्रियेनंतरच आम्ही त्याच्या दुखापतीची तीव्रता तपासू शकू.' क्रिकेट फुटबॉल डेली शेअर करीना चित्रपट आणि मनोरंजन करीना कपूर खानच्या टीमने एक निवेदन जारी केलं असून 'सैफ आणि करीनाच्या घरी चोरीचा प्रयत्न झाला होता, ज्यामध्ये सैफच्या हाताला दुखापत झाली होती. कुटुंबातील इतर सदस्य सुरक्षित आहेत.' त्यांनी माध्यमांना आणि चाहत्यांना आवाहन केले की, 'कृपया धीर धरा आणि कोणत्याही अफवा टाळा. पोलीस तपास करत आहेत. तुमच्या पाठिंब्याबद्दल आणि काळजीबद्दल धन्यवाद.'अशा स्वरूपाचे निवेदन करीना कपूर आणि तिच्या टीमकडून करण्यात आले आहे.

## ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप

ठाणे दि. १६ - जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन आज, दि. १६ जानेवारी रोजी पलावा सिटी, कल्याण येथे करण्यात आला होता. क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व क्रीडा क्षेत्रातील टेबल टेनिसपटू शिवप्रिया यांच्या हस्ते मशाल पेटवून करण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित सर्वांना केले. तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी नवीन खेळांचे आयोजन करण्यात आले असून १८ विविध मैदानी खेळ तसेच इनडोअर गेम (बैठे खेळ) यांचे नियोजन उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी उत्तम केले असल्याने कौतुक केले. तसेच मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी मैदानी खेळ गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. प्रकल्प संचालक धायादेवी शिसोदे यांनी क्रीडा




स्पर्धा व कलाविष्कार अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध गुणांना वाव देण्यासाठी महत्त्वाचे असून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभागी होऊन खेळांचा आनंद घ्यावा, अशा शुभेच्छा दिल्या. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी आरोग्य सुदृढ राहण्यासाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करून खेळाचा आनंद घेणे महत्त्वाचे आहे.

आरोग्याची काळजी घेण्यासाठी तसेच रोजच्या कामाचा ताण विविध खेळ खेळून आनंद व्यक्त करण्यासाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन यावेळी केले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे प्रास्ताविक करताना म्हणाले की क्रीडा महोत्सव आयोजित करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक व बँक ऑफ बडोदा यांच्या सौजन्याने उत्तम नियोजन अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी करणे शक्य झाले आहे. तसेच सर्व विभाग प्रमुख यांनी मोलाचे योगदान दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. सर्वांनी सहभाग नोंदवण्यासाठी व खेळांचे आनंद घेण्यासाठी आवाहन केले.

> मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी मैदानी खेळ गरजेचे - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे


जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta

https://www.facebook.com/jeevandeepnews

https://www.instagram.com/thane_jeevandeep

https://jeevandeepvarta.com

## गीतासार



**आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा । १-३४ ।**

अर्थ

गुरुजन, काका, मुलगे, आजे, मामा, सासरे, नातू, मेहुणे, त्याचप्रमाणे इतर आप्त आहेत. । १-३४ ।

**एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते । १-३५ ।**

अर्थ

हे मधुसूदना, हे मला मारण्यास तयार झाले तरी किंवा त्रैलोक्याच्या राज्यासाठीही मी या सर्वांना मारु शकत नाही. मग या पृथ्वीची काय कथा? । १-३५ ।

**निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः । १-३६ ।**

अर्थ

हे जनार्दना, धृतराष्ट्राच्या मुलांना मारून आम्हाला कोणते सुख मिळणार? या आततायींना मारून आम्हाला पापच लागणार. । १-३६ ।

## आरोग्य टिप्स

## 'कसुरी मेथी' म्हणजे संजीवनीच



कसुरी मेथी, जिला अनेक जण कस्तुरी मेथीदेखील म्हणतात. मात्र तिचा योग्य उच्चार कसुरी मेथी असाच आहे. पाकिस्तान येथे कसूर नावाचे एक ठिकाण आहे, तिथे उच्च दर्जाची मेथी बनते, वाळवली जाते आणि मोठ्या प्रमाणात विकली जाते. त्यामुळे तिथल्या नावावरून तिला 'कसुरी मेथी' म्हटले जाते. नावाची गोष्ट जितकी नाविन्यपूर्ण आहे, तेवढीच कसुरी मेथी खाण्याचे फायदे देखील तुमच्यासाठी नवीन असतील. मात्र, ते वाचून तुम्ही कसुरी मेथी वापराचे प्रमाण वाढवाल हे नक्की! कोणत्याही ग्रेव्ही असलेल्या भाजी मध्ये कसुरी मेथी टाकली की भाजीची लज्जत वाढते. हॉटेलमध्येही जवळपास सगळ्या भाज्यांमध्ये कसुरी मेथीचा वापर केला जातो. अनेक जण घरच्या घरी मेथी वाळवून प्रयोग करतात, पण त्याला कसुरी मेथीची चव येतेच असे नाही. त्यावर प्रक्रिया करून ती पॅकबंद केल्याने तिची चव आणि सुवास टिकून राहतो.

याबरोबरच कसुरी मेथी आरोग्यासाठीही अतिशय लाभदायी आहे हे तुम्हाला माहीत आहे का? विशेषतः महिलांसाठी तर ती संजीवनी आहे असेच म्हटले पाहिजे. कसुरी मेथीमुळे रजोनिवृत्तीच्या लक्षणांपासून अर्थात मेनोपॉजच्या काळात आराम मिळतो. त्यात फायटर इस्ट्रोजेन असते जे मेनोपॉज दरम्यान दरम्यान उद्भवणाऱ्या हार्मोनल असंतुलनाच्या लक्षणांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे अतिस्त्राव, स्वभावाचे असंतुलन आणि इतर हार्मोनल समस्या कमी होतात. तसेच कसुरी मेथीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर आढळते जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. गॅस , बद्धकोष्ठता आणि पोटासंबंधी विकार कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते. यात अँटी-फ्लॅट्युलेंट गुणधर्म आहे, ज्यामुळे पोट स्वच्छ राहण्यास मदत होते.

कसुरी मेथीमध्ये hydroxyisoleucine नावाचा घडकी असतो, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते. मधुमेही रुग्णांना याचा फायदा होतो. यामुळे रक्तदाबही नियंत्रणात राहतो, कोलेस्ट्रॉल कमी होते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते.

# समर्थ रामदास स्वामी



समर्थ रामदासांचे मूळ नाव 'नारायण सूर्याजीपंत कुलकर्णी' (ठोसर) होते. त्यांचा जन्म शके १५३० (सन १६०८) मध्ये, महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील जांब नावाच्या ठिकाणी, रामनवमीच्या दुपारी जमदग्नी गोत्रातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात झाला. समर्थ रामदासजींच्या वडिलांचे नाव सूर्याजी पंत होते. ते सूर्यदेवाचे उपासक होते आणि रोज 'आदित्य हृदय' स्तोत्राचे पठण करायचे. ते गावचे पटवारी होते पण त्यांचा बराचसा वेळ पूजेत जात असे. त्यांच्या आईचे नाव राणूबाई होते. त्या संत एकनाथजींच्या कुटुंबाच्या दूरच्या नातेवाईक होत्या. त्याही सूर्यनारायणाच्या उपासक होत्या. सूर्यदेवाच्या कृपेने सूर्याजी पंतांना गंगाधर स्वामी आणि नारायण (समर्थ रामदास) हे दोन पुत्र झाले. समर्थ रामदासजींच्या थोरल्या भावाचे नाव गंगाधर होते. सगळे त्यांना 'सर्वोत्तम' म्हणत. ते आध्यात्मिकदृष्ट्या चांगले व्यक्ती होते. त्यांनी 'सुगमोपया' नावाच्या ग्रन्थाची रचना केली. त्यांच्या मामाचे नाव भानजी गोसावी होते. ते प्रसिद्ध कीर्तनकार होते.

**बालपण -** एके दिवशी आई राणूबाई नारायण (हे त्यांचे लहानपणीचे नाव होते) यांना म्हणाल्या, 'तू दिवसभर खोडसाळपणा करतोस, काही काम कर. तुझा मोठा भाऊ गंगाधर कुटुंबाची किती काळजी घेतो!' ही गोष्ट नारायण यांच्या मनात घर करुन गेली. दोन-तीन दिवसांनी हे मूल आपले खोडकरपणा सोडून एका खोलीत ध्यानस्थ बसले. दिवसभर नारायण दिसले नाही तेव्हा आईने मोठ्या मुलाला नारायण कुठे आहे असे विचारले.

ते ही म्हणाले, 'मी त्याला पाहिलं नाही.' दोघेही काळजीत पडले आणि त्यांचा शोध घेण्यासाठी निघाले, पण त्यांचा पत्ता लागला नाही. संध्याकाळी जेव्हा त्यांच्या आईने त्यांना खोलीत ध्यान करताना पाहिले तेव्हा त्यांनी विचारले, 'नारायण, तू इथे काय करतोस?' तेव्हा नारायण यांनी उत्तर दिले, 'मला संपूर्ण जगाची चिंता आहे.' या घटनेनंतर नारायण यांचा दिनक्रम बदलला. सुदृढ आणि निरोगी शरीरानेच देशाची प्रगती शक्य आहे, हे त्यांनी समाजातील तरुणांना समजावून सांगितले. त्यामुळे त्यांनी व्यायाम आणि कसरत करण्याचा सल्ला देत शक्तीचे उपासक हनुमानजींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. त्यांनी संपूर्ण भारताचा दौरा केला. संपूर्ण राष्ट्रात नवचैतन्य निर्माण व्हावे म्हणून ठिकठिकाणी हनुमानजींच्या मूर्तींची स्थापना करण्यात आली, ठिकठिकाणी मठ आणि मठाधिपती बांधण्यात आले.

**तपश्चर्या -** वयाच्या १२ व्या वर्षी लग्नाच्या वेळी 'शुभमंगल सावधान' मधील 'सावधान' हा शब्द ऐकून ते लग्नमंडप सोडून टाकळी नावाच्या ठिकाणी श्री रामचंद्रांच्या उपासनेत मग्न झाले. १२ वर्षे ते उपासनेत मग्न राहिले. इथेच त्यांना 'रामदास' हे नाव पडले.

घर सोडल्यानंतर १२ वर्षांचे नारायण नाशिकजवळील टाकळी नावाच्या गावात आले. येथे नंदिनी आणि गोदावरी नद्यांचा संगम आहे. या भूमीला आपली तपश्चर्या करण्याचे ठरवून त्यांनी कठोर तपश्चर्या सुरू केली. ते सकाळी ब्रह्ममुहूर्तावर उठायचे आणि दररोज १२०० सूर्यनमस्कार करायचे. त्यानंतर ते गोदावरी नदीत उभे राहून राम नाम आणि गायत्री मंत्र म्हणत. दुपारच्या वेळी ते फक्त ५ घरांतून भिक्षा मागून प्रभू रामचंद्रजींना नैवेद्य दाखवत असे. त्यानंतर प्रसादाचा वाटा पशू-पक्ष्यांनी बहरल्यानंतर घेत असे. दुपारी ते वेद, वेदांत, उपनिषदे आणि धर्मग्रंथांचा अभ्यास करायचे. त्यानंतर ते पुन्हा नामस्मरण करायचे. त्यांनी १२ वर्षांत १३ कोटी रामनामांचा जप केला. १२ वर्षे त्यांनी अशी कठोर तपश्चर्या केली. या काळात त्यांनी स्वतः रामायण लिहिले. त्यांनी प्रभू रामचंद्रांसाठी रचलेल्या प्रार्थना 'करुणाष्टक' या नावाने प्रसिद्ध आहेत. तपश्चर्या केल्यावर ते २४ वर्षांचे असताना त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. टाकळी येथेच समर्थ रामदासजींनी पहिले हनुमान मंदिर स्थापन केले.

**तीर्थयात्रा आणि भारत भ्रमण -** आत्मसाक्षात्कार झाल्यावर समर्थ रामदास तीर्थयात्रेला निघाले. त्यांनी १२ वर्षे भारताचा दौरा सुरू ठेवला. प्रवास करत असताना ते हिमालयात आले. हिमालयातील पवित्र वातावरण पाहिल्यानंतर मूळचे अलिप्त स्वभावाचे रामदासजींच्या मनात वैराग्य निर्माण झाले. आता आत्मसाक्षात्कार झाला, भगवंताचे दर्शन झाले, मग हा देह धारण करण्याची काय गरज? असा विचार त्यांच्या मनात आला. त्यांनी स्वतःला मंदाकिनी नदीत १००० फूट खाली झोकून दिले. पण त्याच वेळी प्रभुरामांनी त्यांना वर उचलून धार्मिक कार्य करण्याची आज्ञा दिली. धर्मासाठी त्यांनी शरीराचा अर्पित करण्याचा निर्णय घेतला. तीर्थयात्रेवर असताना ते श्रीनगरला आले.
तेथे त्यांची भेट शीख गुरु हरगोविंद जी महाराज यांच्याशी झाली. गुरू हरगोविंद जी महाराजांनी त्यांना त्यांच्या धर्माचे रक्षण करण्यासाठी सशस्त्र होण्याचे मार्गदर्शन केले. प्रवासात लोकांचे हाल पाहून त्याचे मन दुखावले. मोक्ष प्राप्तीबरोबरच स्वराज्य स्थापन करून जनतेला जुलमी राज्यकर्त्यांच्या अत्याचारापासून मुक्त करणे हे त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय केले. लोकांना सरकारच्या विरोधात संघटित होण्याचे आवाहन करत फिरू लागले. या प्रयत्नात त्यांना छत्रपती श्री शिवाजी महाराजांसारख्या कर्तबगार शिष्याचा लाभ झाला आणि स्वराज्य स्थापनेचे स्वप्न त्यांच्या हयातीतच साकार होण्याचे भाग्य लाभले. त्यांनी १६०३ मध्ये वयाच्या ७३ व्या वर्षी महाराष्ट्रातील सज्जनगड नावाच्या ठिकाणी समाधी घेतली.

**समर्थ रामदास स्वामींचे शिष्यमंडळ-** कल्याण स्वामी,उध्दव स्वामी,दत्तात्रय स्वामी,आचार्य गोपालदास,भीम स्वामी,दिनकर स्वामी,केशव स्वामी,हणमंत स्वामी,रघुनाथ स्वामी,रंगनाथ स्वामी,भोळाराम,वेणा बाई,आक्का बाई,अनंतबुवा मेथवडेकर,दिवाकर स्वामी,वासुदेव स्वामी,गिरिधर स्वामी,मेरु स्वामी,अनंत कवी,प्रभु दर्शन

बालपणीच त्यांनी प्रभू रामचंद्रजींना प्रत्यक्ष पाहिले होते. म्हणूनच त्यांनी स्वतःला रामदास म्हणवून घेतले. रामदास स्वामींनी अनेक ग्रंथ लिहिले. यात 'दासबोध' प्रमुख आहे. त्याचप्रमाणे 'मनाचे श्लोक' मधूनही त्यांनी आपली मने सुसंस्कृत केली.

**आईला भेटले समर्थ -** भारत प्रवास करतांना शेवटी वयाच्या ३६व्या वर्षी रामदासस्वामी पैठणला परत आले. पैठणला ते एकनाथांच्या वाड्यातच उतरले. नाथ आणि त्यांची पत्नी या दोघांनी देह ठेवलेला होता. नाथांची पत्नी समर्थांची मावशी होती. पण समर्थांनी कुणालाच ओळख दिली नाही. एक फिरता साधू म्हणून ते त्या घरात राहिले.

मात्र तिथे त्यांना जांब गावातील सगळ्या बातम्या समजल्या. लग्नमंडपातून पलायन केल्यावर २४ वर्षे ते जांब येथील कोणताच्याही संपर्क नव्हते. त्यांच्या वहिनीला दोन मुले झाल्याचे व आई राणूबाई अंध झाल्याचेही त्यांना तेथे कळले. त्यांच्या मनात जांबला जाऊन आईला भेटावे असे आल्यावर समर्थ जांबला पोहोचले पण तेथेही त्यांनी कोणाला आपली ओळख दिली नाही. आपल्या घराच्या अंगणात उभे राहून त्यांनी भिक्षा मागितली. त्यांची वहिनी भिक्षा घेऊन दारात उभी राहिली. तिची राम आणि शाम ही दोन्ही मुले भिक्षा मागणाऱ्याया गोसाव्याकडे पाहत होती. त्यांना ठाऊक नव्हते की हे आपले काका आहेत. २४ वर्षात दाढी, जटा वाढविल्याने आणि व्यायामाद्वारे शरीर बलदंड झाल्याने पार्वतीबाईदेखील दीराला ओळखू शकल्या नाहीत. अखेर समर्थांनी आपले खरे रूप प्रकट केले. नारायण आल्याने राणूबाईंना खूप आनंद झाला.
२४ वर्षांच्या साधनेने समर्थांना काही शक्ती प्राप्त झाल्या होत्या. त्याद्वारे त्यांनी रामचंद्रांना प्रार्थना करून मातेच्या डोळयाला स्पर्श करताच राणूबाईंना दिसू लागले, असे मानले जाते.

तेव्हा समर्थांनी एक अभंग रचून संपूर्ण रामचरित्र आईला ऐकविले. समर्थ ४ महिने जांब येथे राहिले. त्यांनी आपल्या आईला 'कपिल गीता' हा आध्यात्मिक ग्रंथ समजावून सांगितला.

**समर्थ रामदास स्वामींची समाधी -** त्यांनी आयुष्याचा शेवटचा काळ साताऱ्याजवळील परळी किल्ल्यावर घालवला. या किल्ल्याचे नाव सज्जनगड होते. तमिळनाडू राज्यातील तंजावर गावात राहणाऱ्या 'अरणिकर' नावाच्या अंध कारागिराने भगवान श्री रामचंद्रजी, माता सीताजी आणि लक्ष्मणजी यांच्या मूर्ती बनवून सज्जनगडला पाठवल्या. या मूर्तीसमोर समर्थजींनी पाच दिवसांपासून पाण्याविना उपवास केला आणि पूर्वसूचना देऊन, माघ वद्य नवमी शालिवाहन शक १६०३ साल १६८२ रोजी पद्मासनात बसून रामनामाचा जप करत ब्रह्मामध्ये लीन झाले. त्यांची समाधी तेथे आहे. हा समाधी दिवस 'दसनवमी' म्हणून ओळखला जातो. दास नवमीला येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. दरवर्षी समर्थ रामदास स्वामींचे भक्त भारतातील विविध प्रांतात २ महिन्यांचे दौरे करतात आणि या दौऱ्यात मिळालेल्या दानातून सज्जनगडचे व्यवस्थापन चालवले जाते.

**व्यक्तिमत्व -** समर्थजींचे व्यक्तिमत्व भक्ती, ज्ञान आणि त्याग यांनी भरलेले होते. चेहऱ्यावर दाढी आणि डोक्यावर जटावेण्या, भाल प्रदेशावर चंदनाचा टीळा असे. त्याच्या खांद्यावर भिक्षेची पिशवी असायची. एका हातात जपमाळ आणि कमंडलू आणि दुसऱ्या हातात योगदण्ड. ते पायात लाकडीच्या पादुका घालत असे. योगशास्त्रानुसार त्यांची मुद्रा भूचरी होती. मुखी नेहमी राम नामाचा जप करीत आणि फार कमी बोलत असे. ते संगीताचे उत्तम जाणकार होते. त्यांनी अनेक रागांमध्ये गायल्या जाणाऱ्या रचना केल्या आहेत. स्वामी रोज १२०० सूर्यनमस्कार घालायचे, त्यामुळे त्यांचे शरीर खूप मजबूत होते. आयुष्यातील शेवटची काही वर्षे सोडली तर ते आयुष्यात कधीही एका ठिकाणी थांबले नाहीत. ते प्रत्यक्षात दुर्गम गुहा, पर्वत शिखरे, नदीकाठ आणि घनदाट जंगलात राहत होते. याचा उल्लेख समकालीन ग्रंथांमध्ये आढळतो.

**ग्रन्थरचना -** समर्थ रामदास यांनी दासबोध, आत्माराम, मनोबोध इतर ग्रंथांची रचना केली. समर्थांचा मुख्य ग्रंथ 'दासबोध' हा गुरू-शिष्य संवादाच्या स्वरूपात आहे. महाराष्ट्रातील 'शिवथर घळ (गुहा)' या नयनरम्य आणि दुर्गम गुहेत त्यांचे महान शिष्य योगीराज कल्याण स्वामी यांच्या हातून लिहिलेला हा ग्रंथराज त्यांना मिळाला. यासोबतच त्यांनी रचलेले भीमरूपी स्तोत्र आणि मनाचे श्लोक यासह ९० हून अधिक आरत्या महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरात गायल्या जातात. त्यांनी शेकडो 'अभंग'ही लिहिले आहेत. समर्थ हे स्वतः अद्वैत वेदांती आणि भक्तिमार्गी संत होते, पण तत्कालीन समाजाची स्थिती पाहून त्यांनी धर्मग्रंथात राजकारण, प्रपंच, व्यवस्थापन शास्त्र इत्यादी अनेक विषयांवर मार्गदर्शन केले आहे. समर्थांनी १०० हून अधिक देवी-देवतांची स्तोत्रे सोप्या ओघवत्या शब्दात लिहिली आहेत. या स्तोत्रांमध्ये आणि आरत्यांमध्ये भक्ती, प्रेम आणि शौर्य अभिव्यक्त आहे. आत्माराम, मानपंचक, पंचीकरण, चतुर्थमान, बाग प्रकरण, स्फुट अभंग इत्यादि समर्थांच्या इतर रचना आहेत. या सर्व रचना मराठी भाषेतील 'ओवी' या श्लोकात आहेत. तुळजापूरची भवानी माता ही तर समर्थांची कुलस्वामिनी जिथे दर्शन घेतांना समर्थांना 'दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी' ही आरती स्फुरली. श्रीक्षेत्र मोरगावला 'सुखकर्ता दुखहर्ता...' ही आरती श्री समर्थ रामदास स्वामी निर्मित आहे. समर्थांनी शंकराची आरती लिहिली, त्याची कथा मोठी गमतीशीर आहे. तीर्थयात्रा करताना समर्थ जेजुरीला आले असता तिथे खंडेरायाचे दर्शन घेऊन ते लवथेश्वराला आले. जो कोणी मंदिरात झोपतो तो रात्रीच मरण पावतो, अशी या मंदिराची ख्याती होती. हे कळल्यावर समर्थांनी मुद्दाम मंदिरातच झोपायचे ठरवले. ग्रामस्थांनी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला पण समर्थ तसे हट्टी होते. सकाळी ग्रामस्थांनी मंदिरात भीत भीतच प्रवेश केला. पाहतात तर काय! समर्थ भगवान लवथेश्वराची पूजा करीत होते. त्याच वेळी 'लवथवती विक्राळा ब्रम्हांडी माळा' या प्रसिद्ध आरतीची निर्मिती झाली. समर्थांनी खंडेराया, दत्तात्रय, विठ्ठल, श्रीकृष्ण, दशावतार अशा विविध देवांच्या आरत्या केल्या आहेत. रामायणांतील किष्किंधा, सुंदर व युद्ध ही कांडे, कित्येक अभंग, आरत्या, भूपाळया, पदे, स्तोत्रे, राज-धर्म, क्षात्र-धर्म, शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज यांस पत्रे, आपल्या शिष्यांना मार्गदर्शन, मठ आणि त्यांतील उत्सव यांसंबंधी मार्गदर्शन, आत्माराम, अन्वय-व्यतिरेक, वैराग्य-शतक, ज्ञान-शतक, उपदेश-शतक, षड्रिपु-विवेक इत्यादी विषयांवरील विपुल लेखन समर्थांनी केले आहे.

**कार्य -** समर्थ रामदासांनी आपल्या शिष्यांच्या माध्यमातून समाजात एक चैतन्यशील संघटन निर्माण केले. त्यांनी सातारा जिल्ह्यातील 'चाफळ' नावाच्या गावात भव्य श्री राम मंदिर बांधले. हे मंदिर केवळ भिक्षेच्या जोरावर बांधले गेले. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत त्यांनी ११०० मठ आणि आखाडे स्थापन करून लोकांना स्वराज्य स्थापनेसाठी तयार करण्याचा प्रयत्न केला. शक्ती आणि भक्तीचा आदर्श असलेल्या श्री हनुमानजींच्या मूर्ती त्यांनी प्रत्येक गावात स्थापित केल्या. आपण आपल्या सर्व शिष्यांना वेगवेगळ्या प्रांतात पाठवले आणि शिख लोकांमध्ये भक्ती आणि कर्मयोगाचा मार्ग प्रसारित करण्याची आज्ञा दिली. तरुणांना सक्षम करण्यासाठी सूर्यनमस्काराचा प्रचार केला. ३५० वर्षांपूर्वी समर्थांनी संत वेणा स्वामींसारख्या विधवा स्त्रीला मठपतीची जबाबदारी आणि कीर्तन करण्याचा अधिकार दिला. समर्थ रामदासजींच्या भक्तांना आणि अनुयायांना 'रामदासी' म्हणतात. समर्थजींनी स्थापन केलेल्या संप्रदायाला 'समर्थ संप्रदाय' किंवा 'रामदासी संप्रदाय' असे म्हणतात. 'जय जय रघुवीर समर्थ' हा पंथाचा नारा आहे आणि 'श्री राम जय राम जय जय राम' हा मंत्र आहे. लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. केशव बळीराम हेडगेवार इत्यादी दिग्गज नेत्यांवर समर्थजींच्या विचारसरणीचा आणि कार्याचा प्रभाव होता.

**समर्थ रामदासांनी स्थापन केलेले मारुती -** समर्थांनी ११ मारुतींची स्थापना केली.:दास मारुती, चाफळ (राम मंदिरासमोर),वीर मारुती, चाफळ (राम मंदिरामागे),खडीचा मारुती, शिंगणवाडी, चाफळ (डोंगरावर),प्रताप मारुती, माजगांव, चाफळ
उंब्रज मारुती (ता. कराड),शहापूर मारुती (उंब्रज जवळ),मसूर मारुती (ता. कराड),बहे-बोरगांव (कृष्णामाई) मारुती (जि. सांगली),शिराळा मारुती (बत्तीस शिराळा, जि. सांगली) शमनपाडळे मारुती (जि. कोल्हापूर)ऱ्पारगांव मारुती (जि.कोल्हापूर).

**समर्थ स्थापित मठ -** जांब, चाफळ, सज्जनगड, डोमगाव, शिरगाव, कन्हेरी, दादेगाव, मादळमोही

## आई म्हणजे तव्यावरची गरम गरम पोळी



आई म्हणजे तव्यावरची
गरम गरम पोळी
औषधावर दिलेली
लिमलेटची गोळी

आई म्हणजे प्रसादाचा
खडीसाखरेचा खडा
शाळेआधी पाटीवर
लिहून दिलेला धडा

आई म्हणजे पाठीवरून
फिरवलेला हात
मेतकूट कालवलेला
मऊ तूपभात

आई म्हणजे देव्हाऱ्यातील
लक्ष्मीचे चित्र
सगळया मित्रांमधला
माझा आवडता मित्र

- शांता शेळके



## मुगाच्या डाळीचे लाडू

साहित्य-

पिवळी मूग डाळ - एक कप,तूप - अर्धा कप,पिठी साखर - एक कप वेलची पूड - अर्धा टीस्पून,बारीक चिरलेले काजू, बदाम

कृती-

सर्वात आधी मूग डाळ दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. आता भिजलेल्या मुगाच्या डाळीमधून पाणी वेगळे करून ती मिक्सरमध्ये बारीक करावी. एका पॅनमध्ये तूप गरम करून आणि त्यात बारीक केलेली डाळ मंद आचेवर परतवावी. डाळीचा रंग हलका सोनेरी होईपर्यंत आणि सुगंध येईपर्यंत परतवून घ्यावी. नंतर गॅस बंद करून थंड होण्यास ठेवावे. आता त्यामध्ये पिठीसाखर, वेलची पूड आणि सुका मेवा घालावे. व हे मिश्रण चांगल्याप्रकारे मिक्स करावे. आता मिश्रणापासून छोटे लाडू बनवा. तर चला तयार आहे हिवाळा विशेष पौष्टिक मुगाच्या डाळीचे लाडू रेसिपी.

## नैसर्गिक लुकसाठी लिपस्टिकऐवजी या गोष्टी वापरा



सुंदर दिसण्यासाठी, लोक अनेक प्रकारच्या मेकअप टिप्स वापरतात आणि एक अतिशय खास मेकअप उत्पादने म्हणजे लिपस्टिक. जरी तुम्हाला मेकअप घातला पाहिजे असे वाटत नसले तरीही तुम्ही फक्त लिपस्टिक लावून सुंदर दिसू शकता.पण जर तुम्हाला तुमच्या ओठांवर पूर्णपणे नैसर्गिक लूक हवा असेल तर तुम्ही लिपस्टिकऐवजी काही इतर लिप उत्पादने वापरून पाहू शकता. ओठांना नॅचरल लुक दिल्याने ओठ आणि चेहरा या दोन्हींचे आकर्षण आणि सौंदर्य वाढते. आज आम्ही तुम्हाला नॅचरल लूकसाठी कोणत्या गोष्टी वापरायला हव्यात ते सांगत आहोत.

**लिप क्रेयॉन**

जर तुम्हाला तुमचे ओठ गुळगुळीत करायचे असतील तर लिपस्टिकऐवजी लिप क्रेयॉनचा वापर करा. लिप क्रेयॉन लावण्याची फॅशन झपाट्याने वाढत आहे. या काजळया पेन्सिलसारख्या असतात, त्यांना धारदार करत राहा आणि लावत राहा. मॅट आणि ग्लॉस लिप क्रेयॉन्सच्या सहाय्याने तुम्ही तुमचे ओठ नैसर्गिक बनवू शकता. हे ओठांना मॉइश्चरायझ करतात.

**लिप लाइनर**

लिपस्टिक लावण्यापूर्वी लिप लायनर वापरण्याची खात्री करा, त्याचा रंग तुमच्या लिपस्टिकच्या रंगासारखा असावा. जर तो अचूक जुळणारा रंग नसेल, तर तो असा असावा की तो त्याच्यापेक्षा वेगळा दिसत नाही. ओठांच्या आऊटलाइनवर लिप पेन्सिल लावा, लिप पेन्सिलने लिपस्टिक भरा, यामुळे लिपस्टिक जास्त काळ टिकून राहते. यानंतर ब्रशने ओठांवर लिपस्टिक नीट पसरवा.

**लिप स्टेन**

लिप स्टेन लिपस्टिकपेक्षा जास्त टिकाऊ असतात आणि पसरत नाहीत. हे पाणी किंवा जेल आधारित आहे. हे लिपस्टिकसारखे चिकट नाही. जर तुम्हाला तुमच्या ओठांचा रंग दिवसभर फिका पडू नये असे वाटत असेल तर लिप स्टेन हा एक चांगला पर्याय असू शकतो.

**लिप ग्लॉस**

ओठ चमकदार आणि रंगीबेरंगी किंवा नैसर्गिक दिसण्यासाठी लिप ग्लॉस हा एक चांगला पर्याय आहे.
लिप ग्लॉस तुमच्या ओठांना मऊ आणि लवचिक तर ठेवतेच शिवाय एक सुंदर लुकही देते. लिपस्टिकप्रमाणे ते मेण, तेल आणि रंगद्रव्याच्या मिश्रणाने बनलेले असतात. पातळ ओठांसाठी लिपग्लॉस खूप चांगले आहे. हे ओठांवर एक चमकदार थर तयार करते, ज्यामुळे ओठ अधिक मोकळे आणि भरलेले दिसतात.

**लीप बाम**

लिप बाम ओठांच्या पृष्ठभागावर एक थर तयार करतो, ज्यामुळे ओलावा बंद होतो आणि ओठ मऊ राहतात. लिप बाममध्ये असलेले मेण, पॅराफिन, लॅनोलिन इत्यादी ओठांना कोरडे ठेवतात आणि ते क्रस्ट होत नाहीत. तसेच चेहरा फ्रेश दिसतो. तुमच्या आवडीनुसार तुम्हाला शोभेल अशा शेडचे लिप बाम तुम्ही निवडू शकता.

# सिटी पार्कमध्ये चित्रकला स्पर्धा उत्साहात



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याण पश्चिमेतील सिटी पार्कमध्ये महापालिका विजय ॲड्स आणि अविष्कार फाउंडेशन यांचेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेस जवळ-जवळ १३०० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग दर्शवून भरघोस प्रतिसाद दिला. सिटी पार्कच्या निसर्गरम्य वातावरणात शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या चित्रकला स्पर्धेत सहभागी होवून चिमुकल्या बालगोपालांनी आपल्या कुंचल्याने नयनरम्य रंगांची उधळण करीत चित्रकला स्पर्धेचा मनमुराद आनंद लुटला. या चित्रकला स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मा.खासदार सुरेश म्हात्रे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. मा.खासदार सुरेश म्हात्रे यांनी सहभागी बालचमूची प्रशंसा केली आणि विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी अशा स्पर्धा यापुढेही आयोजित करण्यात याव्यात, असे निर्देश उपस्थित अधिका-यांना दिले.

महापालिकेतर्फे अशा स्पर्धांचे आयोजन भविष्यातही करण्यात येईल, असे आश्वासन महापालिकेचे माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी आपल्या भाषणात दिले.

यासमयी परिमंडळ-३ चे पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे, माजी पोलीस उपआयुक्त सचिन गुंजाळ, कल्याणचे तहसिलदार सचिन शेजाळ व इतर मान्यवर उपस्थित होते.

# बोरगांवकर वाडी वाहनतळ महापालिकेच्या ताब्यात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

काल सायं. महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांचे निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे व मालमत्ता विभागाचे उपआयुक्त रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता विभागाचे अधिक्षक जयराम शिंदे व लिपिक प्रशांत धिवर, प्रविण घिगे व इतर कर्मचारी वर्गाने कल्याण रेल्वे स्थानकाजवळील बोरगांवकर वाडी वाहनतळ संबंधित ठेकेदाराकडील रु. १,२८,०२,४४०/- इतक्या रक्कमेच्या थकबाकी पोटी महापालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही केली. बोरगांवकर वाडी बांधिव वाहनतळ (पे ॲन्ड पार्क) या धरतीवर ३ वर्षाच्या कालावधीकरीता, भाडेतत्वावर चालविण्यासाठी मे.श्री.समर्थ एंटरप्रायझेस यांस दि. १६/११/२०२३ रोजीच्या कार्यादेशान्वये देण्यात आले होते. सदर वाहनतळ पे ॲन्ड पार्क तत्वावर सुरु



करण्यापूर्वी संबंधित ठेकेदाराने पहिल्या ३ महिन्याचे भाडे रु. ५९,२०,९७६/- इतकी रक्कम महापालिका फंडात भरणा केली होती.

तद्नंतर सदर परिचालक हे करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे महापालिकेचे भाडे नियमित भरणा करीत नसल्यामुळे, त्यांस बोरगांवकर वाडी वाहनतळाचे भाडे भरण्यासाठी नोटीसा बजाऊन देखील, संबंधित ठेकेदाराने भाडे रक्कम महापालिकेत भरणा केली नाही. महापालिकेच्या मालमत्ता विभागाने दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी प्रत्यक्ष वाहनतळाची पाहणी केली असता, बेसमेंटमधील पार्कींगसाठी वापर सुरु असल्याचे, त्याचप्रमाणे पार्कींग शुल्क आकारणी करीत असल्याचे निदर्शनास आले होते. यामध्ये सुमारे १००० दुचाकी वाहने पार्कींग केल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर ठिकाणी पार्कींग होत नसल्याची सबब पुढे करुन संबंधित ठेकेदार वाहनतळाचे भाडे भरणा करण्यास टाळाटाळ करुन, महापालिकेचे आर्थिक नुकसान करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे बोरगांवकर वाडी वाहनतळावर पे ॲन्ड पार्क धरतीवर चालविणेबाबतचा मे.श्री.समर्थ एंटरप्रायझेस यांचे सोबतचा करारनामा संपुष्ठात आणून, निविदाकाराने महापालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत, इसारा रक्कम जप्त करणेबाबत आदेश मालमत्ता विभागाचे उपआयुक्त रमेश मिसाळ यांनी निर्गमित केले आहे.

संबंधित मे.श्री.समर्थ एंटरप्रायझेस यांस काळया यादीत टाकण्यात येत असून, त्यांस अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे व्यवसाय करण्यास मनाई करण्यात येत आहे.

# भिवंडी- वाडा रस्त्याचे निकृष्ट काम नागरिक संतप्त



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/झिडके-अंबाडी(प्रतिनिधी)**

भिवंडी-वाडा या रस्त्याचे गेल्या अनेक महिन्यांपासून काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे,भिवंडी तालुक्यातील झिडके-अंबाडी नाका ' उड्डाणपूल भिवंडीकडे जाणाऱ्या ठिकाणी' रस्त्याचे जे पक्क्या स्वरूपाचे काँक्रिटीकरण झाले आहे,ते करताना रस्त्याची उंची सव्वा-दीड फुटाची जुन्या रस्त्यालगत ठेवल्यामुळे या रस्त्यावर मोटारसायकल,व अनेक प्रकारच्या वाहनांचे अपघात होऊन,मोठ्या प्रमाणात अपघात होणार आहेत,व माणसे आपले जीव गमावणार आहेत. या सार्वजनिक बांधकाम विभाग भिवंडीच्या नियमबाह्य व निष्काळजी कामकाजातविरोधात बांधकाम क्षेत्रातील जाणकार सामाजिक कार्यकर्त ' मनसेचे तालुकाध्यक्ष ' विकास जाधव यांनी सदर रस्त्याची प्रत्यक्ष जागेवर येऊन पाहाणी करून आपली संतप्त भूमिका व्यक्त केलीआहे,सदर रस्त्यावर यापुढे एकही माणूस अपघातात मृत्यू झाल्यास सा.बां.विभाग यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविण्यात येईल याकरिता ' मनसे' गांभीर्यपूर्वक दखल घेणार आहे,असे स्पष्टपणे विकास जाधव यांनी वृत्तप्रतिनिधींकडेआपली भूमिका व्यक्त केली आहे.

या परिसरातील नागरिकांकडून अशीही संतप्त प्रतिक्रिया आहे की,झिडके-अंबाडी नाका येथे १० कोटी रूपयांचे अनुदान शुशोभिकरण करता आले असता,या अनुदानाचा गैरवापर झालेला आहे,तसेच प्लॅन,इस्टीमेंट नुसार अजिबात काम झालेले नाही,सदर १० कोटी अनुदानाच्या कामाची निर्दोष पद्धतीने चौकशी करण्यात यावी की,जेणेकरून नागरिकांच्या मनात असलेली शंका दूर होईल,हे सा.बां.विभाग निसंकोचपणे करतील का? आजमितीस सा.बां.विभाग यांच्या नियमबाह्य कामामुळेच येथील स्थानिक रहिवाशांना पावसाळयात आपल्या घरात पावसाचे पाणी साचून जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान सहन करावे लागत आहे,रस्त्याचे काम करताना पूर्वापार शेतजमीनीतून वाहून जाणारे पाण्याचे मार्ग बंद केले आहेत. सद्यस्थितीत झिडके-अंबाडी नाका येथे चालू असलेल्या कामाबाबत नागरिकांकडून असणाऱ्या समस्यां प्रत्यक्ष पाहाण्यासाठी सा.बां. विभागाचे अधिकारी बोलावूनही येत नाहीत,ही मोठी शोकांतिका आहे. झिडके-अंबाडी येथे भिवंडी-वाडा रस्त्याचे जे सिमेंट काँक्रिटीकरण सुरू आहे त्यामुळे रस्त्याच्या लगत असणाऱ्या रहिवाशांचे धुळीमुळे त्यांना आपल्या घरात राहणे मुश्किल झाले आहे,त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.या बाबी येथे रस्त्याचे काम करणारे ठेकेदार यांना सांगूनही दुर्लक्ष करीत आहेत याबाबत जबाबदारी कोण घेणार?असे असंख्ये प्रश्न याठिकाणी नागरिकांच्या मनात निर्माण झाले आहेत,या कामाकडे कोणत्याही राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधीं वा कार्यकर्त्यांचे लक्ष नाही,याचे कारण ही बरीचशी मंडळी सा.बां.विभागाचे ठेकेदार व हितचिंतक आहेत.असे येथील नागरिकांचे स्पष्ट मत आहे.

तर या बेदखल कामाबाबत झिडके-अंबाडी येथील चालू असणाऱ्या या नियमबाह्य रस्त्याच्या कामासंबंधी सध्या व यापूर्वी केलेल्या कामाबाबत येथील स्थानिक नागरिक,बांधकाम विषयक जाणकार 'महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे भिवंडी तालुका अध्यक्ष' यांनीच तीव्र संताप व्यक्त करून आपली भूमिका एका व्हीडिओमार्फत नागरिकांसाठी प्रसारित करून,यापुढे या रस्त्यावर अपघाताने मृत्यू होणाऱ्या घटनेला सा.बां.विभाग जबाबदार असणार आहे,व सदर विभागावर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविण्यात येणार असल्याची ठाम भूमिका मनसे पक्षाची असल्याचे स्पष्टपणे जाहीर केले आहे. व एकप्रकारे सा.बां.विभागाला वेळीच दखल न घेतल्यास यापुढील घटनांना सामोरे जावे लागेल असा स्पष्ट निर्वाणीचा इशारा देण्यात आला आहे.

# जीवनदीप मध्ये स्कूल कनेक्ट २.० कार्यशाळा संपन्न







**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/गोवेली(प्रतिनिधी)**

भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी झाली आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शिक्षण पद्धतीमध्ये झालेला बदल त्याचा भविष्यात होणारा परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी तसेच मार्गदर्शन करण्यासाठी आज जीवनदीप शैक्षणिक संस्थापोई संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे आज दि १५ जानेवारी २०२५ रोजी सादूबेला कॉलेज उल्हासनगरचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठातील सिनेट मेंबर , शिक्षणतज्ञ , महात्मा ज्योति जीवन गौरव पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार अशा अनेक पुरस्काराने सन्मानित झालेले डॉ. वसंत माळी यांच मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित केल होत. यावेळेस अनेक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीलाच जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी आपलं मनोगत व्यक्त केल . त्यात ते म्हणाले बदल हा अपरिहार्य असतो. आताच्या पिढीशी प्रगलबता अधिक आहे. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रातला बदल गरजेचा आहे. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. वसंत माळी यांनी या नवीन लागू झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबद्दल सविस्तर माहिती सांगितली त्याचबरोबर या धोरणाचे भविष्यात होणारे फायदे सांगितले. तसेच या नवीन लागू झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट स्पष्ट करून उत्तमरीत्या मार्गदर्शन केले. यावेळेस गणेश विद्यालय टिटवाळा च्या रोहिणी भाटे, भारतीय सैनिक विद्यालय खडवलीचे संदीप भोये शकुंतला विद्यालय अनखरपाडाच्या छाया बोरसे, माधवराव रोकडे विद्यालयाच्या वृषाली कदम, मराळेश्वर विद्यालय म्हारळ चे शिवाजी चौधरी, जागृती विद्यालय दहागाव चे श्यामकुमार मिरकुटे, रायते विभाग हायस्कूलचे देविदास सूर्यवंशी सरस्वती हायस्कूल घोडसईचे आत्माराम राऊत, अब्दुल कादिर जुवारी उर्दू हायस्कूलचे सीमाब कुंगळे तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे , सर्व प्राध्यापक प्राध्यापिका आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला,या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा.सतीश लकडे यांनी केले.

# मेट्रोचे काम प्रवाशांना ताण !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**



जिथे जिथे बांधकामे होत आहेत, लोकवस्ती वाढत आहे,किंवा रस्त्यावर कुठे ही ठिक ठिकाणी वाढणारी बेकायदेशीर रिक्षा स्टँड, यावर रिक्षाची होणारी गर्दी, प्रवाशांची पळवापळवी यातून होणारी वाहतूक कोंडी, वादावादी, प्रंसगी यामुळे होणा-या हाणामा-या,यासर्वांचा नाहक त्रास प्रवासी व इतर वाहन चालक आणि नागरिकांना होत असल्याने अशा अनाधिकृत स्डँडवर कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

कल्याण, उल्हासनगर, भिंवडी, अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड इत्यादी शहरात मोठ्या प्रमाणात रस्त्याची ,मेट्रो, ची कामे सुरू आहेत, अशातच या परिसरात झपाट्याने नागरिकरण होत आहे, या ठिकाणी बेकायदेशीर रिक्षा स्डँड सुरू होत आहेत, अशा स्डँडवर किती रिक्षा उभ्या राहाव्यात याबाबत कोणतेही बंधन नाही, कोणी कुठेही रिक्षा उभ्या करून प्रवाशांची पळवापळवी करत आहेत, कल्याण, म्हारळ, वरप कांबा, बिर्ला गेट,शहाड, उल्हासनगर, इत्यादी ठिकाणी अशी परिस्थिती प्रकर्षाने दिसून येत आहे.यामुळे, कल्याण मुरबाड, मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते, स्टेशन, दिपक हॉटेल, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान, बाईचा पुतळा, म्हारळ सोसायटी, आदी ठिकाणी वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे, यामुळे एसटी किंवा इतर वाहनांना आत शिरने अवघड झाले आहे. वाहतूक विभाग अशा बेशिस्त रिक्षाचालकावर दररोज कारवाई करतात, मात्र त्यांच्या वर फरक पडत नाही, यामुळे चांगले प्रामाणिकपणे रिक्षा चालक बदनाम होत आहेत.ओहरशीट, भाडे नाकारने, जादा भाडे घेणे, मुली, महिला, जेष्ठ नागरिक, यांची छेडछाड, वाद घालणे,प्रवाशांसी उध्दठ, दादागिरी करणे, प्रंसगी हाणामारी, खून असे प्रकार वांरवार वाढत आहेत.काही वेळी तर वाहतूक पोलिसांवर देखील हात उचलले जातात.त्यामुळे अशा बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई करावी, यासाठी उबाठा चे शिवसेना उपनेते विजय साळवी यांच्या नेतृत्वाखाली कल्याण आरटीओ ना जाब विचारण्यात आला, तसेच अधिकृत रिक्षा स्डँड,शहर व थेट रिक्षाचे दरफलक लावणे, अनाधिकृत रिक्षावर कारवाई करावी, त्यांचेवर नियंत्रण ठेवणे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# केडीएमसीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

शासनाच्या निर्देशानुसार राज्यात सर्वत्र दि. १४ ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. या पंधरवड्यात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पंधरवड्याचा शुभारंभ दि. १७ जानेवारी २०२५ रोजी सायं. ०६.०० वाजता मा.आयुक्त महोदया यांच्या प्रमुख उपस्थितीत डोंबिवली (पूर्व) येथील गांवदेवी उद्यान येथे होणार असून, महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे २७ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत मराठी भाषा जनजागृतीसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

तद्नंतर दि. २१ जानेवारी २०२५ रोजी महापालिका कर्मचारी वर्गासाठी गीतगायन स्पर्धा, दि. २० ते २४ जानेवारी २०२५ या कालावधीत प्रश्नमंजूषा स्पर्धा, दि. २२ जानेवारी २०२५ रोजी शुध्द लेखनासहित मराठी हस्ताक्षर स्पर्धा, दि. २० ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीत चारोळी स्पर्धा अशा अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन महापालिका वर्गासाठी करण्यात आले आहे. तसेच महापालिका शालेय विद्यार्थ्यांसाठी दि. २० ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत मराठी निबंध स्पर्धा, म्हणी आणि वाक्प्रचार अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याची सांगता दि. २८ जानेवारी २०२५ रोजी साय. ०६.०० वाजता कल्याण (पश्चिम) येथी सिटी पार्क येथे होणार असून, यावेळी देखील सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण तसेच विविध स्पर्धांतील विजेते कर्मचारी व विद्यार्थी यांच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्वच्छतेमुळे शहराची प्रतिमा उंचावते

## – अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

शहराच्या स्वच्छतेवरुन शहराची प्रतिमा जनमानसापर्यंत पोहचते, त्यामुळे स्वच्छतेचे काम सर्वात महत्वाचे असे प्रतिपादन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी आज केले. महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरातील कॉन्फरन्स हॉलमध्ये सफाई कर्मचा-यांकरीता आयोजिलेल्या क्षमता बांधणी कार्यशाळेत बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले..

या कार्यशाळेत उपस्थित सफाई कर्मचा-यांना 'सफाई-मित्र' असे संबोधत, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी सफाई कर्मचा-यांशी संवाद साधत आपल्या छोटेखानी भाषणात स्वच्छतेचे महत्व



उपस्थित सफाई कर्मचा-यांना पटवून दिले.

स्वच्छ आणि सुंदर रस्ते यांचे श्रेय केवळ सफाई कर्मचा-यांचे असून, सफाई कर्मचा-यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळून देण्यासाठी शिबीर लावावे, असे निर्देश त्यांनी यावेळी संबंधित अधिका-यांना दिले. तसेच सेवा विषयक काही विषय असल्यास ते मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी आपल्या भाषणात दिली. आपले स्वतःचे स्वास्थ चांगले असेल, तर चांगली कामे होऊ शकतील. यासाठीच या कार्यशाळेचे/ प्रशिक्षणाचे आयोजन केले असल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी यावेळी दिली आणि प्रशिक्षणातील आपले अनुभव, ज्ञान कृतीत आणा असे सांगत स्वच्छतेचे महत्व उपस्थित सफाई कर्मचा-यांसमोर अधोरेखित केले.

दिव्य स्वप्न फाऊंडेशन या संस्थेमार्फत आतापर्यंत डोंबिवलीच्या प्रभागात कार्यरत असणा-या ८०० सफाई कर्मचा-यांना आता पर्यंत क्षमता बांधणीचे प्रशिक्षण देण्यात आले असून, आता कल्याण मधील सफाई कर्मचा-यांना हे प्रशिक्षण सदर संस्थेमार्फत दिले जात आहे. आजच्या या कार्यशाळेत उत्कृष्ठ सफाई कर्मचा-यांना अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड व उपस्थित इतर अधिका-यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पीपीई कीट, मास्क, ग्लोव्हज्, शुज, रिफलेक्टर जॅकेट इ. अंतर्भाव असलेला सुरक्षा संच देवून गौरविण्यात आले.

यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सहा.आयुक्त प्रिती गाडे, मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलूरकर, ३/क प्रभागाचे स्वच्छता अधिकारी संदिप खिस्मतराव, घनकचरा व्यवस्थापन विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी आणि ३/क प्रभागातील सफाई कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# टिटवाळा महोत्सवात जीवनदीप महाविद्यालयाचा लोकाविष्कार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/टिटवाळा(प्रतिनिधी)**

दि. १४ जाने.२०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने टिटवाळा शहरातील भव्यदिव्य अशा टिटवाळा महोत्सवात ' लोककलांचे सादरीकरण केले. या महोत्सवात जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष श्री.रविंद्र घोडविंदे सर संचालिका सौ.स्मिता घोडविंदे मॅडम उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लोकनृत्याचे उपस्थित मान्यवर,अतिथी, प्रेक्षक , आयोजकांनी भरभरून कौतुक करुन त्यांना सन्मानित केले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.बी.कोरे, संचालक श्री.प्रशांत घोडविंदे, उप प्राचार्य प्रा.हरेंद्र सोष्टे यांनी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. महेश थोरात यांनी कार्यक्रमाचे नृत्यदिग्दर्शन, रंगभूषा, वेशभूषा करून महत्वाची जबाबदारी पार पाडली. तसेच या महोत्सवात महाविद्यालयातील प्राध्यापकांनी , विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आस्वाद घेतला.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# राज्यात ईएसआयसी १८ नवी रुग्णालये उभारणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)
राज्यातील कामगारांसाठी आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या राज्य कामगार विमा सोसायटीने राज्यात १८ नवी रुग्णालये उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी सर्वाधिक चार रुग्णालये रायगडमध्ये, तर छत्रपती संभाजी नगर व पुण्यामध्ये प्रत्येकी दोन रुग्णालये मंजूर झाली आहेत. या रुग्णालयासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे.
राज्य कामगार विमा सोसायटी राज्यातील कामगारांसाठी १२ रुग्णालये व संलग्न २५३ रुग्णालयातून आरोग्य सेवा पुरवते. राज्यात विमाधारक कामगारांची ४८ लाख ७० हजार ४६० कुटुंब आहेत. तर लाभार्थी संख्या जवळपास दोन कोटीपर्यंत आहे. या कामगारांना अधिक चांगल्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी राज्यात विविध ठिकाणी १८ नवी रुग्णालये उभारण्यास मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार रायगडमध्ये सर्वाधिक चार रुग्णालये उभारण्यात येणार असून, पेण, पनवेल, कर्जत व खोपोली येथे ही रुग्णालय उभारण्यात येणार आहे. तसेच छत्रपती संभाजी नगरमध्ये वाळूंज आणि शेंद्रा येथे, तर पुण्यामध्ये बारामती व चाकण येथे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पालघर, सातारा, अमहदनगर, नाशिक, जळगाव, वर्धा, अमरावती, सांगली, रत्नागिरी व चंद्रपूर येथे प्रत्येकी एक रुग्णालय उभारण्यात येणार आहे.

# स्मार्ट सिटी बरोबर नागरीकांची सुरक्षाही हवी

## स्फूर्ती फाऊंडेशनची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)
कल्याण पूर्व घटनेच्या पार्श्वभूमीवर कल्याण शहरातील महिला, मुली, जेष्ठ नागरिकांची सुरक्षा हेतू शाळा, महाविद्यालय, चौक, गर्दीची ठिकाणे अद्यावत सि सि टिव्ही कॅमेरे लावून अनुचित प्रकार व घटनांना आळा घालण्यासाठी स्फूर्ती फाउंडेशन वतीने कल्याण डोंबिवली महानगरपालिका व कल्याण स्मार्ट सिटी कॉर्पोरेशनला निवेदन देण्यात आले. स्मार्ट सिटी बरोबर नागरीकांच्या सुरक्षेला प्राथमिकता देण्याची मागणी स्फूर्ती फाऊंडेशनच्या वतीने अध्यक्ष बजरंग तांगडकर यांनी केली आहे.

नागरिकांच्या तक्रारीनुसार महिला, मुली, जेष्ठ नागरिक सुरक्षित हेतूने व चोरीचे प्रकार, अनुचित प्रकार मुळे तातडीने कल्याण परिसरात शाळा, महाविद्यालय, चौक परिसर, मुख्य ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे. बलात्कार, विनयभंग, छेडछाडीसह, अल्पवयीन मुली आणि महिलांच्या हत्या, लैंगिक अत्याचार अथवा जीव घेण्याचा प्रकार असो अशा घटना घडत आहेत. २०२४ मध्ये अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या ६५ घटना दाखल झाल्या तर विनयभंगाच्या ७२ घटना झाल्या होत्या.त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षा हेतू व चोरीच्या तसेच अपघात घटना घडल्या नंतर पोलीस विभागाला चौकशीच्या दृष्टीने व अशा घटना घडू नये यासाठी आवश्यक अद्यावत दर्जाचे सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत अशी मागणी स्फूर्ती फाऊंडेशनच्या वतीने केडीएमसीकडे करण्यात आली आहे.

# पेण येथे भूगोल दिनानिमित्त नकाशे प्रदर्शन



दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता
पेण(प्रतिनिधी)
पेण एज्युकेशन सोसायटीच्या पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात 'भूगोल दिनानिमित्त'तसेच 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा' या निमित्त विविध प्रकारचे नकाशे, नकाशा पुस्तक (ॲटलास) तसेच भौगोलिक छायाचित्रे, उपग्रह प्रतिमा, प्रकल्प अहवाल यांचे प्रदर्शन दिनांक १४ आणि १५ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाले. महाविद्यालयातील कला ,विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. फक्त मार्क किंवा अभ्यास या पलीकडे, मानवी जीवनातील प्रत्येक टप्प्यावर नकाशांचे महत्त्व कसे आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. नैसर्गिक आपत्ती, देशाचे संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे नियोजन, व्यवस्थापन, समस्यांचे निराकरण करण्यासाठी नकाशांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, हे भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ अरूण पाटील यांनी विद्यार्थ्यांना विस्ताराने व उदाहरणांसह पटवून दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. धारप सर ,ग्रंथपाल गोपाल जोशी आणि ग्रंथालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# ३८ लाख टन सोयाबीन कवडीमोल दरात

दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी)
देशभरातील बाजार समित्यांत ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ या सोयाबीन विक्रीच्या मुख्य काळात ४६ लाख टन सोयाबीनची आवक झाली. त्यापैकी डिसेंबरअखेर 'नाफेड'च्या वतीने देशभरातील विविध खरेदी केंद्रांवर ८.१२ लाख टन सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्यात आली. उर्वरीत ३७.८८ लाख टन सोयाबीन कवडीमोड दराने खासगी बाजारात विकला गेला. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ४०० रुपयांचा फटका बसला आहे.



'सोयाबीन असोशिएशन ऑफ इंडिया'ने (सोपा) दिलेल्या माहितीनुसार, गेल्यावर्षी देशात सुमारे १२५.८२ लाख टन सोयाबीनचे उत्पादन झाले. त्यापैकी ४६ लाख टन सोयाबीनची ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४, या काळात देशभरातील विविध बाजार समित्यांमध्ये आवक झाली. नाफेडने दिलेल्या माहितीनुसार, डिसेंबरअखेर ८ लाख १२ हजार ३२२ टन सोयाबीनची हमीभावाने खरेदी झाली. त्यापैकी मध्य प्रदेशातून ३.८८ लाख टन, महाराष्ट्र २.६२ लाख टन, तेलंगणा ७७ हजार टन, राजस्थान ३७ हजार टन, गुजरातमधून २९ हजार टन आणि कर्नाटकातून १५ हजार टन सोयाबीनची खरेदी झाली आहे.

# पालघर येथे पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(ऋषीकेश जाधव))
पालघर सहकार भारती स्थापना दिनानिमिताने शिक्षक पतपेढी भवनात पालघर येथे, सहकार भारती पालघर जिल्हा (प), उपनिबंधक पालघर जिल्हा, सहाय्यक निबंधक पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने पतसंस्था प्रकोष्ठ प्रायोजित पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रम मान्यवर यांच्या विद्यमाने संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात सहकार गीताने करण्यात येऊन, सहकार भारतीच्या माजी अध्यक्षा शशीताई अहिर यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रम सुरू करण्यात आला.

मान्यवर पूर्वा सावंत यांनी सहकार भारतीच्या कार्यपद्धती आणि संस्थेच्या व्यापक कार्याचा आढावा घेत, सहकार भारती कशा प्रकारे कार्य करते आणि आजच्या परिस्थितीत सहकार संस्थेची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तर मान्यवर प्रशांत पाटील - पालघर तालुका पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष - यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपीठावर भरत काळे स्वामी विवेकानंद पतपेढी- सफाळे, खजिनदार उपस्थित होते. कुलकर्णी सरांनी आपले मनोगत व्यक्त करताना सहकार यांचे महत्त्व कथन केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तानाजी कवडे यांनी आदर्श लेखापरीक्षण अहवाल, वसुली व्यवस्थापन तंत्र, CRAR, आणि पतसंस्था गुणपत्रिका या महत्त्वाच्या विषयांवर सरळ सरळ आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. गुजराथी सरांनी पतसंस्था कशा पारदर्शक होऊ शकतात यावर विषेश मार्गदर्शन करून, पारदर्शकता समजून सांगितली. सदर कार्यक्रमाला तालुक्यातील २५ पतसंस्थांचे प्रतिनिधी यानी, आपली उपस्थितीती दर्शविलेली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख कौमुदी काळे यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने केले.तर महामंत्री नितीन वझे यांनी कार्यक्रमाचा समारोप करता करता, सहकार भारतीने पतसंस्था प्रशिक्षण का आयोजित केले, त्याचे महत्त्व काय ? आणि त्यामुळे पतसंस्थांना होणारा लाभ यावर भाष्यकरीत, शशीताई अहिरेंच्या स्मृतींना आदरांजली वाहून त्यांच्या कार्याचा गौरव केला. सरद या प्रशिक्षण कार्यक्रमाचा एकूण ११३ प्रशिक्षणार्थी यांनी लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिव संकेत कुडू, अनंत कुडू, हेमंत पाटील, मंगेश उईके, मनीष कांबळी, किसन किणी, मनीषा राऊत, सौ. हर्षदा तरे, मीनल वैद्य, आदिती काळे, सुजाता पागधरे आणि इतर सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

# आ.रवि पाटील यांच्या हस्ते विकासकामांची उदघाटने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पेण(प्रतिनिधी)
पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मसद बु. येथे आज १६ जानेवारी रोजी नवीन अंगणवाडी कामाचे उद्घाटन माजी कॅबिनेट मंत्री तथा विद्यमान आमदार रवीशेठ पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. नीलिमा ताई पाटील ह्यांच्या हस्ते पार पाडण्यात आला.

यावेळी वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे साहेब, मसद सरपंच हरिश्चंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष स्वप्नील पाटील, के. डी म्हात्रे, जोमा पाटील गुरुजी, अंतोरे सरपंच अमित पाटील, शेखर पाटील, कमलाकर पाटील गुरुजी. गावातील प्रतिष्ठित नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते.

# जाहिर नोटीस

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरबाड यांचे कार्यालय, मुरबाड

**प्रति,**
**१) श्री. मंगल महादु निमसे,**
**राहणार रा. खरशेत (उमरोली),**
**ता. मुरबाड, जि. ठाणे, .... अर्जदार**
**विरुद्ध**
**२) ग्रामपंचायत तळेगाव,जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे ....सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे :

१. उपरोक्त अर्जदार यांचे आजी कै. आवडी बोंगा निमसे यांचा मृत्यू दिनांक ०२/०५/२००४ रोजी राहत्या घरी मौ.खरशेत-उमरोली, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधानामुळे सदर जन्म/ मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी जन्म/ मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा.तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ८७५ दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या आजी जन्म/ मृत्यु च्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे २७/१२/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

**हुकमावरुन**
**सही /-**
**(श्रीम. सुषमा अव्हाड-बांगर)**
**निवासी नायब तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**

**जा.क्र. फौजदारी/जन्म मृत्यू नोंद/कावि -५२८/२०२४**

# म्हसा येथे उबाठा गटाचा मेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
मुरबाड(दिलीप पवार)
संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध असणाऱ्या ठाणे जिल्हातील मुरबाड येथील खांबलिंगेश्वर म्हसोबाच्या यात्रेला प्रारंभ झाला असून या यात्रेला लाखो भाविक हजेरी लावून या जागृत देवस्थानचे दर्शन घेतात. या यात्रेच्या अनुषंगाने भिवंडी लोकसभेतील शिवसैनिकांशी सुसंवाद साधण्यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भिवंडी लोकसभा संपर्कप्रमुख साईनाथ (मामा) तारे यांच्या माध्यमातून स्नेहभोजनाचे (दि. १५ जाने) रोजी आयोजन करण्यात आले होते.



उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसैनिकांच्या साठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम म्हसा गावाजवळील गणेशकृपा हॉटेलच्या हॉल मध्ये आयोजीत करण्यात आला होता. या स्नेहमेळाव्यात सौ. ज्योतीताई ठाकरे (उपनेत्या), साईनाथ मामा तारे (संपर्क प्रमुख भिवंडी लोकसभा), सोन्या पाटील (सह संपर्क प्रमुख ), निलेश गंधे (सह संपर्क प्रमुख ), मनोज गगे (जिल्हाप्रमुख )मधुकर अप्पा घुडे उपजिल्हाप्रमुख, संतोष जाधव तालुकाप्रमुख मुरबाड ,संदीप बहाडकर शहरप्रमुख मुरबाड , तर विशेष उपस्थितीत मराठी बिगबॉस स्टार गायक संतोष चौधरी उर्फ दादुस व प्रसिद्ध गायक नवनाथ पाटील यांचा ऑर्केस्ट्राने कार्यक्रमाने भारीच रंगत आणली. तर नरेंद्र भाऊ यशवंतराव सचिव, भरत गायकर विधानसभा क्षेत्र संघटक, निलेश चौधरी युवासेना विधानसभा अधिकारी, मिलिंद घरत युवासेना सचिव , संदीप बहाडकर शहरप्रमुख , विनायक ढमणे समन्वयक , विवेक डोहळे, कैलास भोईर तालुकाप्रमुख महिला आघाडी, महिला आघाडीच्या उर्मिलाताई लाटे, माधुरीताई वाळिंबे इत्यादी पदाधिकारी उपस्थीत होते.

या स्नेहमेळाव्याला उपजिल्हा प्रमुख मधूकर आप्पा घुडे, मुरबाड तालूका प्रमुख संतोष जाधव, संपर्क प्रमुख साईनाथ तारे,सहसंपर्क प्रमुख सोन्या पाटील, उपनेत्या ज्योतीताई ठाकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसैनिकांना मार्गदर्शन केले.

# एक दशकापासून नायगाव खाडी पूल अर्धवट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
वसई(प्रतिनिधी)
दहा वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही नायगाव सोपारा खाडीवरील पुलाचे काम अजूनही अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे या पुलावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना चढउतार करून प्रवास करावा लागत आहे. नायगाव स्थानकावर जाण्यासाठी खाडी पुलावर नवीन पूल तयार करण्याचे काम २०१४ मध्ये हाती घेण्यात आले होते. यासाठी जवळपास ४ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र त्यानंतर निर्माण झालेल्या विविध प्रकारच्या अडचणींमुळे रखडले होते. केवळ एका बाजूच्या उतार मार्गाचे काम पूर्ण करून हा पूल खुला केला होता. परंतु दुसऱ्या बाजूच्या उतार मार्गाचे काम सुरू असताना खाडीच्या दलदलीमुळे डिसेंबर २०२० एका बाजूला भाग खचला होता. त्यामुळे या पुलाच्या बांधकामावर नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला होता. या घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाचे पुन्हा सर्वेक्षण, उतार मार्गात दलदल असल्याने त्याचे माती परीक्षण ही करण्यात आले होते.
त्यानुसार उर्वरित कामासाठी नवीन आराखडा तयार केला असून हा पूल ४६ मीटरने वाढीविला जाणार आहे. यासाठी अंदाजे साडेसहा कोटी रुपये इतका निधी मंजूर झाला आहे. मात्र आता ज्या भागात पुढील काम होणार आहे ती जागा खारभूमी, खासगी मालकीची असल्याचा दावा करण्यात आला असून आता हे प्रकरण न्यायालयात पोहचले आहे. सद्यस्थितीत या कामाला न्यायालयाने ही स्थगिती दिली असल्याने पुढील काम पूर्ण करता येत नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.खाडी पूल तयार करण्याचे काम सुरू होऊन दहा वर्षे झाली तरीही पुलाचा प्रश्न मार्गी लागला नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. दररोज एका बाजूने प्रवास करताना नागरिकांना जिने चढ उतार करून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला, अपंग नागरिक यांची चांगलीच दमछाक होत आहे. या पुलाच्या संदर्भात शासन स्तरावरून योग्य तो तोडगा काढून पुलाचे काम मार्गी लावावे अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

# आत्मा मालिक संकुलात क्रीडा दिवस संपन्न

## तालुकास्तरीय मिनी मॅरेथॉन व कुस्ती स्पर्धेचे आयोजन करुन राज्य क्रीडा दिवस साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
वासिंद(प्रतिनिधी)
येथील मोहिली-अघई येथील विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट संचलित, आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात तालुकास्तरीय मिनी मॅरेथॉन व कुस्ती स्पर्धेचे आयोजन करुन राज्य क्रीडा दिवस संपन्न झाला.

शहापूर तालुक्यातील मोहिली-अघई येथील आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात परमपूज्य आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशीर्वादाने संत भारत माता व संत परिवाराच्या प्रेरणेतून व संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी व समस्त विश्वस्त मंडळ व संकुलाचे कार्याध्यक्ष तथा विश्वस्त उमेश जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाने क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित तालुकास्तरीय मिनी मॅरेथॉन व कुस्ती स्पर्धेचे आयोजन करुन राज्य क्रीडा दिवस साजरा करण्यात आला.

स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव, स्थानिक शाखा सदस्य अनंतजी गायकवाड, प्रवीण मोरे व्यवस्थापक उल्हास पाटील, आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य पंकज बडगुजर, आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य कैलास थोरात, उपप्राचार्य दिपाली खांडगे, वसतिगृह विभागाचे व्यवस्थापक बिकास रॉय आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख पुरुषोत्तम पानबुडे यांनी केले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्राविण्य प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक ध्यानाने करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभागातील सर्व क्रीडा शिक्षक-शिक्षिकेतर व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले होते.

# इंफॅन्ट जिजस शाळेच्या विद्यार्थ्यांचा गौरव




दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
अंबरनाथ(प्रफुल केदारे)
अंबरनाथ पुर्वेकडील शैक्षणिक आघाडीवर असणाऱ्या इंफॅन्ट जिजस शाळा ही विद्यार्थी व पालकांमध्ये लोकप्रिय आहे. अभ्यासक्रमीय, कला, साहित्य व संस्कृतीच्या संवर्धना साठी अग्रगण्य असणार्या या शाळेने क्रिडा क्षेत्रातील दैदिप्यमान कामगिरी चा आढावा दर्शवणारा वार्षिक क्रीडा दिनाने अंबरनाथ करांच लक्ष वेधून घेतले. गीताच्या तालावर हॉलीबॉल, फुटबॉल, टेबल टेनिस, क्रिकेट, बॉक्सिंग, कराटे खेळाच्या प्रदर्शनाने उपस्थित भारावले शाळेच्या प्रांगणात प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत हा क्रिडा महोत्सव पार पडला.
शाळेचे हे सलग चौथे वर्ष होते . शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या सांस्कृतिक सादरीकरणाने भारावलेल्या मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. महाराष्ट्र राज्य महिला फुटबॉल संघाच्या मुख्य प्रशिक्षिका सुरभी संदीप मांजरेकर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली होती. तर, अंबरनाथ नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा प्रज्ञा बनसोडे, ऑल इंडिया ह्युमन राइट्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य प्रभारी अजय श्रीनिवास राव चिरीवेल्ला आदी अतिथी उपस्थित होते.
यावेळी शाळेच्या संचालिका दीपा एडविन व मुख्याध्यापिका शांती राव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. तसेच विविध विषयात प्राविण्य मिळविणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावर्षी १०वीतील अदिती नंदापुरकर हिने ९९% गुण इंग्रजीत पटकावली. यासाठी म्हणून तिला उत्कृष्ट संचालिका अवॉर्डने सन्मानित करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेच्या शिक्षिका रेखाडे यांनी तर आभारप्रदर्शन श्रावणी मॅडम यांनी केले.

# अन उद्यानात गीतसुरांचे 'आनंदघन' बरसु लागले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
अंबरनाथ(प्रतिनिधी)
सध्या कराओके क्लब मुळे हौशी गायक आणि संगीत प्रेमींना मुक्त दालन प्राप्त झाले आहे. नुकतेच अंबरनाथचे माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी यांच्या पुढाकाराने शहरातील ओसाड पडलेल्या आनंदघन संगीत पार्क मध्ये आता गीत गायन मंच उपलब्ध झालाय. त्यामुळे आता आठवड्यातील रविवारी ईथे हौशी गायक व श्रोत्यांना संगिताची पर्वणी लाभणार आहे. तसेच संगीत क्षेत्रातील प्रविण कलावंतांच्या मुलाखती ही पहायला मिळतील.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या आनंदघन या टोपणनावाने असणाऱ्या हा पार्क २०१२ साली नगरपरिषदेच्या माध्यमातून उभारण्यात आलाय. मध्यंतरी दुर्लक्षित असलेला हा पार्क आता नवीन रुप धारण करतोय. येथे गायकांसाठी रंगमंच, ध्वनी व्यवस्था, प्रकाश योजना, खुर्च्यांची आसन व्यवस्था, विनामूल्य उपलब्ध होतेय. नुकतीच १२ जानेवारी रोजी येथे ' कराओके संध्या ' मैफिल रसिकांच्या प्रतिसादात पार पडली. या सांज मैफिलित अनेक नवोदित



गायकांकडुन सुश्राव्य गाण्यांचा आनंद रसिकांनी लुटला. यामुळे शहरातील संगीत प्रेमीना आता निःशुल्क खुला मंच मिळतोय. येणाऱ्या २६ जानेवारी रोजी देशभक्ती पर गितांचा कार्यक्रम येथे पार पडणार असल्याची माहिती या कार्यक्रमाच्या संचालिका, सुप्रसिद्ध गायिका रेवा थिवारीअर, यांनी दिली.

या उद्यानातील स्तंभावर आता अंबरनाथ शहरातील संगीत क्षेत्रातील मातब्बर संस्था व कलावंतांची माहिती झळकणार आहे. या उपक्रमात निखिल चौधरी, गायक विश्वास जाधव, सुलेखा वाणी, माजी सैनिक संघाचे एस बी मिश्रा, डॉ वसंत महाजन, डॉ गणेश राठोड, सचिन ठाकुर यांची महत्त्वाची भूमिका असणार आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी